# स्वाइन-फ्लूच्या साथीचा सामना करूया !







पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# स्वाइन–फ्लूची शंका केव्हा घ्यावी?

- घसा-दुखी, खोकला असेल व त्यासोबत १००° फॅ.पेक्षा जास्त ताप सतत दोन दिवस असेल तर

किंवा

- तापासोबत केव्हाही दम लागला तर ते गंभीर लक्षण समजून ताबडतोब उपचारासाठी जावे.

किंवा

- घसा-दुखी, ताप याबरोबरच ज्यांच्या बाबतीत खालील गोष्टी असतील अशांबाबतही स्वाइन-फ्लू ची शंका घ्यावी-

१. गेल्या आठ दिवसात परदेश प्रवास झाला असेल तर

२. गेल्या आठ दिवसात स्वाइन-फ्लूच्या रुग्णाशी निकटचा संपर्क झाला असेल तर











पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# शंका आल्यावर काय करावे?



- आपल्या फॅमिली डॉक्टरकडे किंवा जवळच्या निर्देशित सरकारी केंद्रामध्ये प्राथमिक छाननीसाठी जावे.




- जाताना नाकातोंडाला चौपदरी फडके किंवा मास्क लावावा.

**डॉक्टर छाननी करतील व 'संशयित रुग्ण' आहे असे वाटल्यास रुग्णाच्या घशातील थेंबाचे सँपल घेऊन ते स्वाइन फ्लूच्या निदानासाठी पाठवतील. तपासणीच्या रिपोर्टची वाट न पाहता अशा संशयित रुग्णावर 'टॅमीफ्लू' या गोळ्यांचा उपचार सुरू करायचे आता ठरले आहे.**

पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# आपल्याला लागण होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी?

- संशयित रुग्ण किंवा स्वाइन फ्लू झालेला रुग्ण याच्या जवळ (सहा फुटाच्या आत) जाऊ नये.
- थिएटर, नाट्यगृह, एअर कंडिशन्ड मॉल्स इ. बंदिस्त व गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये.
- बाहेरून जाऊन आल्यावर साबणाने हात धुवावे कारण स्वाइन फ्लूचे विषाणू लागण झालेल्याच्या खोकल्यातून, शिंकांमधून बाहेर पडून टेबल, खुर्ची, बस अशा आसपासच्या ठिकाणी स्थिरावून ३ ते ८ तास जिवंत राहतात. याच कारणासाठी नाक, चेहरा याला हात लावायचे टाळावे.
- एकमेकांना भेटतांना हस्तांदोलन करू नये.







पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे



# मास्क कोणी लावावा?

- सगळ्यांनीच मास्क लावण्यात अर्थ नाही. स्वाइन फ्लूचे रुग्ण, संशयित रुग्ण, खोकला-तापाचे रुग्ण यांनी मास्क (किंवा चौपदरी फडके) लावायला हवे. खोकतांना शिंकताना त्यांच्या नाकातोंडातून उडणारे विषाणुयुक्त शिंतोडे त्यामुळे अडतील.
- या रुग्णांवर किंवा संशयित रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स, इतर कर्मचारी यांनी तसेच रुग्णाची, संशयित रुग्णाची काळजी घेणारे कुटुंबिय यांनी एन-९५ हा अधिक चांगला मास्क लावणे आवश्यक आहे.
- मास्क, फडके धुवून परत वापरायला हरकत नाही.

पत्रक मजकूर- साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# विशेष काळजी कोणी घ्यावी?

- गरोदर स्त्रिया,
- वृद्ध माणसे
- पाच पेक्षा कमी वयाची मुले
- एच.आय.व्ही. लागण झालेल्या व्यक्ती
- मधुमेह, दमा, हृदयविकार इ. असणा-या व्यक्ती



पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# रुग्णांनी काय करावे?

- संशयित रुग्णांनीही घराबाहेर पडू नये. साधा मास्क लावावा.
- शासकीय यंत्रणेतून मिळणा-या गोळयांचा कोर्स पूर्ण करावा.
- शिंकतांना, खोकतांना चौपदरी रूमाल नाका-तोंडापुढे धरावा.
- घरातील फरशी, टेबल इ. फिनेलच्या पाण्याने रोज पुसायला हवे.
- भरपूर पाणी प्यावे, नीट आहार घ्यावा.
- सर्व लक्षणे गेल्यावर पुढे एक दिवस घरी थांबून मगच घराबाहेर पडावे. त्या आधी घराबाहेर पडावे लागले तर मास्क घालावा.









पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे

# नागरिकांनी काय सहकार्य करायला हवे?

- घाबरू नये. स्वाइन फ्लूचे बहुसंख्य रुग्ण आपोआप बरे होतात. फक्त थोड्याच रुग्णांना गंभीर स्वाइन-फ्लू होतो. वेळेवर उपचार मिळाल्यावर तेही बरे होतात.
- सुट्टी मिळालेल्या मुलांना घराबाहेर जाऊ देऊ नये. कारण त्यापैकी कोणाला लागण झाली तर स्वाइन फ्लूची लक्षणे दिसण्याआधीच एक दिवस त्याच्या श्वासातून, शिंका-खोकल्यातून हे विषाणू पसरू लागतात.
- धार्मिक सण फक्त घरातच साजरे करावे. इतर सार्वजनिक कार्यक्रम व उत्सव सध्या बंद ठेवावे. देऊळ, चर्च, मशीद इ. ठिकाणी जाऊ नये.
- माझे सँपल घेतलेच पाहिजे, मला 'टॅमीफ्लू' मिळालेच पाहिजे असा विनाकारण अट्टाहास धरू नये.

पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे





# वेळेवर औषधोपचार मिळाल्यावर स्वाइन फ्लू बरा होण्याचे प्रमाण खूप जास्त आहे. तरी विनाकारण घाबरू नये.

पत्रक मजकूर– साभार जन आरोग्य अभियान, पुणे